No.: MSRDC/MPEWML/11-2017 part II/2018/ 5151
Date : 09.07.2018

Maharashtra State
Road Development
Corpn. Ltd.
(A Government of Maharashtra Undertaking)

To,
Deputy Conservator of Forests (T),
Senapati Bapat Marg, Opp. Symbiosis College,
Pune-411004

**Sub.:** Submission of Revised proposal of Forest Clearance under Forest Conservation Act, 1980 for Diversion of 40.5074 Ha Forest Land in Pune Division for Construction of Proposed Mumbai-Pune Expressway Missing Link (MPEWML) of 13.3 km from Khopoli Exit on YCEW to Sinhagad Institute near Lonavala.

Respected Sir/Madam,

In accordance with above mentioned subject, we are submitting 8 sets of revised Forest Diversion Proposal in hard copy, seeking for diversion of 40.5074 Ha. Forest Land for Non-Forest Purpose here with this letter.

It is requested to please direct the concerned in this matter to take further necessary action.

Encl.: 1. Revised FDP (8 Sets)
2. KML of proposed alignment in CD format

Gangurde 09/7/18

**(Sanjay Gangurde)**
**Executive Engineer,**
**MSRDC (Ltd.), Mumbai**

**Copy submitted to:**

1. Shri Dhote, Chief Engineer (SP), MSRDC, Mumbai
2. Shri Auti, Superintending Engineer, MSRDC, Pune

4ule 10/7/18.

आवक / जावक लिपीक
पुणे वन विभाग, पुणे

Corporate Office : Opp. Bandra Reclamation Bus Depot, Near Lilavati Hospital, K C Marg, Bandra (West), Mumbai - 400 050.
Telephone No.: 022-26400190/201, 26558175/76 Fax No.: 022-26417893

Regd. Office : Nepean Sea Road, Besides Priyadarshini Park, Mumbai - 400 036.
Telephone No.: 022-23685909, 23613789, 23691030
Website : www.msrdc.org , CIN : U45200MH1996SGC101586

क्र. मरारविम/वायसीइडब्लूएमएल/११-२०१७-part II/२०१८/ 5155
दिनांक : ०९.०७.२०१८

प्रति,
उपवनसंरक्षक, अलिबाग वनविभाग,
मु.पो.ता.अलिबाग,
जि. रायगड – ४०२ २०१
दुरध्वनी क्र.- ०२१४१-२२२०१६

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास
महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

विषय : **वनजमीन रायगड**
मुंबई पुणे द्रुतगती महामार्गांतर्गत नवीन आखणी मार्गात खोपोली ते लोणावळा दरम्यान रस्त्याचे बांधकाम करणेसाठी वन जमिन मागणीचा प्रस्ताव.

संदर्भ : १. आपले पत्र क्र. ब/२०/जमिन/२०३८/२०१७-१८ दिनांक ०४.०८.२०१७.
२. या कार्यालयाचे पत्र क्र. मरारविम/वायसीइडब्लूएमएल/११-part II/२०१८/३७३८, दि. ०७.०५.२०१८.
३. आपले पत्र क्र. ब/२०/जमिन/६२६/२०१८-१९ दिनांक १६.०५.२०१८.

महोदय,

संदर्भिय पत्र क्र. २ नुसार सुधारित प्रस्तावाची प्रत आपले कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावात काही त्रुटी आढळून आल्याबाबत आपले कार्यालयाकडून वरील संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार कळविण्यात आले होते.

तरी, संदर्भिय पत्र क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या त्रुटींची मुद्देनिहाय पुर्तता खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे :

| अ. क्र. | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| १. | प्रस्तावांतील वनजमिन मागणी क्षेत्रामध्ये भूमि अभिलेख विभागाची संयुक्त मोजणीतील क्षेत्रामध्ये तफावत येत असल्याने दिनांक २०.०२.२०१८ रोजी जागेवर संयुक्त पहाणी करून क्षेत्र निश्चित करणेबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. ६ अन्वये निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने वनजमिन मागणी क्षेत्र निश्चित केले बाबतचा अहवाल व भूमि अभिलेख | वनजमिन मागणी क्षेत्र निश्चित केले बाबतचा अहवाल आणि भूमि अभिलेख विभागाकडील संयुक्त मोजणी पत्रक व संयुक्त मोजणी नकाशे सादर करीत आहोत. |

जावक लिपीक उप वनसंरक्षक अलिबाग यांचे कार्यालय 11/7/2018

निगम कार्यालय : वांद्रे रेक्लेमेशन डेपोसमोर, लिलावती हॉस्पिटल जवळ, के.सी. मार्ग, वांद्र (प), मुंबई- ४०० ०५०.
दूरध्वनी : ०२२-२६४००१९०/२०१, २६५५८१७५/७६ फॅक्स: ०२२-२६४१७८९३

नोंदणीकृत कार्यालय: नेपियनसी रोड, प्रियदर्शिनी पार्क शेजारी, मुंबई- ४०० ०३६.
दूरध्वनी: ०२२-२३६८५९०१ / २३६१३७८१/ २३६११०३०

| अ. क्र. | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| | विभागाकडील संयुक्त मोजणी पत्रक व संयुक्त मोजणी नकाशे सादर केलेले नाहीत. | |
| २. | या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये आपणास कळविण्यात आलेल्या त्रूटींची मुद्दे निहाय पूर्तता करणेत आलेली नाही. तरी याबाबत खुलासा करणेत यावा. | पत्र क्र. ४ अन्वये सुचविण्यात आलेले बदल २५.०७.२०१७ रोजी सादर केलेल्या प्रस्तावा संबंधित होते. तरी त्यानंतर करण्यात आलेल्या JMS नुसार गाव निहाय क्षेत्रामध्ये तफावत आढळून आली होती. तफावत दुरूस्त करून सुधारीत प्रस्तावात सुचविलेले बदल समाविष्ट केले आहेत. |
| ३. | प्रस्तावांत केंद्रशासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार बाधीत होणारे वनक्षेत्र / वनेत्तर क्षेत्राचा गांवनिहाय / सर्व्हे क्रमांक निहाय (Item wise break-up) क्षेत्र विवरण तक्त प्रस्तावात सादर केलेला नाही. तरी विहित नमुन्यांतील क्षेत्र विवरण तक्ता प्रस्तावांत सामील करण्यात यावा. | सुधारीत प्रस्तावात केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार विहित नमुन्याप्रमाणे क्षेत्र विवरण तक्ता सामील करून सादर करण्यात येत आहे. |
| ४. | जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील वनहक्क अधिनियम, २००६ अंतर्गत प्रमाणपत्रामध्ये कलम ३(१) अंतर्गत आदिवासी खातेदार यांचे मंजूर दाव्यातील वनक्षेत्राचा गाव निहाय, सर्व्हे नंबर निहाय तपशील दिलेला नाही. वनजमिन मागणी क्षेत्रात वनहक्क अधिनियमांतर्गत निश्चित कोणत्या गावांतील किती क्षेत्र बाधीत होत आहे त्याचा बोध होत नाही. केवळ Annexure (उप विभागीय अधिकारी, कर्जत, तहसिलदार खालापूर, मुख्य अधिकारी, खोपोली नगर परिषद) दिलेले आहेत. सदर Annexure नुसार स्पष्टता होत नाही. | वनहक्क अधिनियम (२००६) अंतर्गत प्रमाणपत्राची सुधारीत आवृत्ती मिळविण्यात आली आहे. ज्यामध्ये गावनिहाय / सर्व्हे निहाय तपशील दिसून येतो हे प्रमाणपत्र सुधारीत प्रस्तावात जोडून सादर करीत आहोत. |
| ५. | प्रस्तावामध्ये वनजमिन मागणी क्षेत्राचे Geo-Digital Map समाविष्ट केलेले नाहीत. तरी प्रस्तावांत Geo-Digital Map समाविष्ट करण्यात यावा. | सुधारीत प्रस्तावात Geo-Digital Map समाविष्ट करून सादर करीत आहोत. |
| ६. | प्रस्तावांत पर्यायी वनीकरणाकरीता वर्ग करण्यात येणारे क्षेत्राचा तपशील उदा. नकाशे, KML File, shape file, ७/१२ उतारा, पर्यायी वनेत्तर क्षेत्र वनीकरणाकरीता योग्य असल्याबाबत संबंधित उप वनसंरक्षक याचेप्रमाणपत्र, पर्यायी वनीकरणाची योजना इत्यादी. प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे. | प्रस्तावात पर्यायी वनीकरणाकरीता वर्ग करण्यात येणारे क्षेत्राचे नकाशे, KML file, shape file, ७/१२ उतारा पर्यायी वनीकरणाची योजना इत्यादी जोडून देण्यात आलेला आहे. |
| ७. | प्रस्तावामध्ये समाविष्ट केलेल्या नकाशामध्ये क्षेत्र विवरणाचा तपशील अस्पष्ट दिलेला आहे. तसेच नकाशामध्ये वनक्षेत्र व वनजमिन मागणी क्षेत्र विहित | नकाशात सुचविलेल्या दुरूस्त्यांसहित क्षेत्र विवरणाचा तपशील स्पष्ट करून सादर करीत आहोत. |

| अ. क्र. | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| | रंगाने दर्शविलेले नाही. तरी नकाशामध्ये दुरूस्तीकरून सुधारित नकाशा प्रस्तावांत सामील करणेत यावा. | |
| ८. | प्रस्तावांतील वनक्षेत्र दर्शविताना जुना सर्व्हे नंबर / नवीन गट नंबरचा तपशील नमुद केलेला नाही. तरी त्याबाबतचा तपशील देण्यात यावा. | जुने सर्व्हे नंबर आणि नविन गट नंबरचा तपशील नमूद करून सुधारीत प्रस्ताव सादर करीत आहोत. |
| ९. | प्रस्तावांतील फॉर्म-अ भाग-१ मधील माहिती परिपूर्ण भरलेली नाही. तरी परिपूर्ण माहिती भरून फॉर्म-अ भाग-१ प्रस्तावांत सामील करण्यात यावा. | फॉर्म मधील माहिती ती पूर्णपणे भरून सुधारीत प्रस्ताव सादर करीत आहोत. |
| १०. | प्रस्तावांत Cost Benefit Analysis चा केवळ नमुना जोडलेला आहे. त्यामध्ये कोणताही तपशील दिलेला नाही. | Cost Benefits Analysis सुधारीत प्रस्तावात समाविष्ट करण्यात आलेला आहे. |
| ११. | प्रस्तावांत मार्गदर्शक सुचनांनुसारच आवश्यकती प्रमाणपत्र समाविष्ट करण्यात यावीत. | सुधारीत प्रस्तावात ५७ check list नुसार प्रमाणपत्रे समाविष्ट करण्यात आलेली आहे. |
| १२. | प्रस्तावांत सामील करण्यात आलेली तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची स्पष्ट व वाचनीय प्रत साक्षांकीत करून जोडण्यात यावी. | सुधारीत प्रस्तावात तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची स्पष्ट व वाचनीय प्रत जोडण्यात आलेली आहे. |
| १३. | प्रस्तावांत सामील केलेल्या ७/१२ उताऱ्यांची आंग्लभाषेंतील भाषांतरीत प्रत प्रस्तावांत सामील करण्यात याव्यात. | सर्व ७/१२ उतारांची आंग्लभाषेतील भाषांतरीत प्रत सुधारीत प्रत प्रस्तावांत जोडण्यात येत आहे. |
| १४. | प्रस्ताव ऑनलाईन forestclearance.nic.in या संकेतस्थळावर या कार्यालयास सादर करणेत यावा. | प्रस्ताव ऑनलाईन forest clearance.nic.in या संकेतस्थळावर सादर करण्यात आला आहे. |

वरील संदर्भिय पत्र क्र. २ मध्ये नमूद केलेल्या सर्व त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव ८ प्रतीत आपले कार्यालयास पुढील प्रक्रियेसाठी सादर करण्यात येत आहे.

**सोबत** : १. सुधारीत वनक्षेत्र वळतीकरण प्रस्ताव (८ प्रती)
२. प्रस्तावित Alignment ची KML file (CD मध्ये)

Gangurde 09/7/18

**(संजय गांगुर्डे)**
**कार्यकारी अभियंता**
**म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई**

प्रत :

१. श्री. धोटे, मुख्य अभियंता (वि.प्र.), मरारविम, मुंबई
२. श्री. औटी, अधिक्षक अभियंता, मरारविम, पुणे
३. श्री. नरेंद्र टोके, पर्यावरण सल्लागार, मरारविम, मुंबई